RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ६, अंक १०८(३)] शुक्रवार, नोव्हेंबर ६, २०२०/कार्तिक १५, शके १९४२ [पृष्ठे ८, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २६८**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ नोव्हेंबर २०२०.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९.**

क्रमांक एफएलआर. ०६२०/प्र.क्र. ९०/राउशु-२—ज्याअर्थी, महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) नियम, १९६३ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून, हे नियम महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, (१९४९ चा पंचवीस) चे कलम १४३ चे पोट कलम (३) मधील तरतुदीनुसार पूर्वप्रसिद्धीशिवाय तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ चे पोट-कलम (२) मधील खंड (ब), (फ), (ह-१) व (यु) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून याद्वारे, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) नियम, १९६३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) (सुधारणा) नियम, २०२० असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) नियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा “प्रधान नियम” असा निर्देश करण्यात आला आहे) मधील नियम ३ क ऐवजी खालीलप्रमाणे नियम अंतर्भूत करावा :—

“३**(क) नोंदणी प्रमाणपत्राची मंजुरी.**—नियम ३(ब) अन्वये अर्ज प्राप्त झाल्यावर, आयुक्त हे त्या अर्जाची आवश्यकतेनुसार चौकशी करतील व अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे अनुज्ञप्ती मंजूर करण्यास काही हरकत नाही अशी खात्री झाल्यावर, आयुक्त

खाली दर्शविल्याप्रमाणे परवानाधारक विक्री करू इच्छित असलेल्या प्रत्येक प्रकारच्या मद्याच्या पेट्यामधील वार्षिक विक्रीच्या प्रमाणात, वार्षिक शुल्क (मोबदल्यासह) वसूल करून, नमुना "एल" हे नोंदणी प्रमाणपत्र मंजूर करतील—

(१) प्रत्येकी ९ लिटरच्या ५००० पेट्या पर्यंतची विक्री—

(अ) स्पिरीटस्, बिअर व वाईनकरिता ... रु. २५,०००

(ब) फक्त बिअर करिता ... रु. १५,०००

(क) फक्त वाईनकरिता ... रु. १०,०००

(२) प्रत्येकी ९ लिटरच्या ५००१ ते १०,००० पेट्या पर्यंतची विक्री—

(अ) स्पिरीटस्, बिअर व वाईनकरिता ... रु. २,००,०००

(ब) फक्त बिअर करिता ... रु. १,००,०००

(क) फक्त वाईनकरिता ... रु. ५०,०००

(३) प्रत्येकी ९ लिटरच्या १०,००१ ते ५०,००० पेट्या पर्यंतची विक्री—

(अ) स्पिरीटस्, बिअर व वाईनकरिता ... रु. ४,००,०००

(ब) फक्त बिअर करिता ... रु. २,००,०००

(क) फक्त वाईनकरिता ... रु. १,००,०००

(४) प्रत्येकी ९ लिटरच्या ५०,००१ ते १,००,००० पेट्या पर्यंतची विक्री—

(अ) स्पिरीटस्, बिअर व वाईनकरिता ... रु. ८,००,०००

(ब) फक्त बिअर करिता ... रु. ४,००,०००

(क) फक्त वाईनकरिता ... रु. २,००,०००

(५) प्रत्येकी ९ लिटरच्या १,००,००१ ते २,००,००० पेट्या पर्यंतची विक्री—

(अ) स्पिरीटस्, बिअर व वाईनकरिता ... रु.१०,००,०००

(ब) फक्त बिअर करिता ... रु.५,००,०००

(क) फक्त वाईनकरिता ... रु. ३,००,०००

(६) प्रत्येकी ९ लिटरच्या २,००,००१ पेट्या पेक्षा जास्त विक्री—

(अ) स्पिरीटस्, बिअर व वाईनकरिता ... रु.१५,००,०००

(ब) फक्त बिअर करिता ... रु.७,५०,०००

(क) फक्त वाईनकरिता ... रु. ४,००,०००

३. प्रधान नियमातील "नियम ३ ड" ऐवजी, खालीलप्रमाणे "नियम ३ ड" अंतर्भूत करण्यात येते आहे :—

"३ड. **ब्रॅन्डची/लेबलची मंजुरी**.—नियम ३ क अन्वये मंजूर नोंदणी प्रमाणपत्रधारक हा, सीमा शुल्क सरहद्दीमधून जो मद्य प्रकार राज्यात आणू इच्छित आहे, अशा प्रत्येक मद्याच्या ब्रॅन्ड/लेबलच्या मंजुरीसाठी आयुक्तांकडे अर्ज दाखल करेल. अर्ज प्राप्त झाल्यावर, आयुक्त हे त्या अर्जाची आवश्यकतेनुसार चौकशी करतील व अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे ब्रॅन्ड मंजूर करण्यास काही हरकत नाही अशी खात्री झाल्यावर, आयुक्त ब्रॅन्ड मंजूर करतील. मंजूर ब्रॅन्ड/लेबलच्या आरेखन व रुपरेषा/आराखडा यामध्ये कोणताही बदल नसल्यास, नोंदणी प्रमाणपत्राचा विधीग्राह्य कालावधी संपल्यानंतर देखील, सदर ब्रॅन्डची मंजुरी अस्तित्वात राहील.

परंतु असे की, मंजूर ब्रॅन्ड/लेबलच्या आरेखन व रुपरेषा/आराखडा यामध्ये कोणताही बदल झाल्यास, नोंदणी प्रमाणपत्रधारक हा ब्रॅन्ड/लेबल मंजुरीसाठी नव्याने अर्ज सादर करेल.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, Dated 6th November 2020

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT, 1949.

No. FLR 0620/ C.R 90/EXC-2.—Whereas the Government of Maharashtra considered that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor (Import and Export) Rules, 1963, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (*b*), (*f*), (*h1*) and (*u*) of sub-section (*2*) of section 143 of Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor (Import and Export) Rules, 1963, namely :—

1. These rules may be called the Bombay Foreign Liquor (Import and Export) (Amendment) Rules, 2020.

2. For rule 3C of the Maharashtra Foreign Liquor (Import and Export) Rules, 1963 (hereinafter referred to as "the Principal Rules"), the following shall be substituted, namely :—

"3C. *Grant of certificate of Registration*.— On receipt of an application made under rule 3B, the Commissioner shall make such enquiries as he deems necessary and on being satisfied that there is no objection to grant the registration applied for, he may grant the certificate of registration in Form 'L' on payment of annual fees (inclusive of consideration), depending on the scale of annual sales of each type of liquor in boxes that the certificate holder proposes to sell in the State of Maharashtra, at the following rates,—

(*i*) Sale upto 5,000 boxes of 9 litre each,—

| | |
|---|---|
| (*a*) For Spirits, Beer and Wine | Rs. 25,000 |
| (*b*) For Only Beer | Rs. 15,000 |
| (*c*) For Only Wine | Rs. 10,000 |

(*ii*) Sale from 5,001 to upto 10,000 boxes of 9 litre each,—

| | |
|---|---|
| (*a*) For Spirits, Beer and Wine | Rs. 2,00,000 |
| (*b*) For Only Beer | Rs. 1,00,000 |
| (*c*) For Only Wine | Rs. 50,000 |

(*iii*) Sale from 10,001 to upto 50,000 boxes of 9 litre each,—

| | |
|---|---|
| (*a*) For Spirits, Beer and Wine | Rs. 4,00,000 |
| (*b*) For Only Beer | Rs. 2,00,000 |
| (*c*) For Only Wine | Rs. 1,00,000 |

(*iv*) Sale from 50,001 to upto 1,00,000 boxes of 9 litre each,—

| | |
|---|---|
| (*a*) For Spirits, Beer and Wine | Rs. 8,00,000 |
| (*b*) For Only Beer | Rs. 4,00,000 |
| (*c*) For Only Wine | Rs. 2,00,000 |

(*v*) Sale from 1,00,001 to upto 2,00,000 boxes of 9 litre each,—

| | |
|---|---|
| (*a*) For Spirits, Beer and Wine | Rs. 10,00,000 |
| (*b*) For Only Beer | Rs. 5,00,000 |
| (*c*) For Only Wine | Rs. 3,00,000 |

(*vi*) Sale of more than 2,00,001 boxes of 9 litre each,—

| | | |
|---|---|---|
| (*a*) | For Spirits, Beer and Wine | Rs. 15,00,000 |
| (*b*) | For Only Beer | Rs. 7,50,000 |
| (*c*) | For Only Wine | Rs. 4,00,000” |

3. For rule 3D of the Principal Rules, the following shall be substituted, namely :—

“3D. *Approval of Brand/Labels.*—The holder of the certificate of registration granted under rule 3C shall apply to the Commissioner for approval of the brands/labels of each kind of liquor intended to be removed from the Customs Frontier for import in the State of Maharashtra. On receipt of such application the Commissioner shall make such enquiries as he deems necessary and on being satisfied that there is no objection, to approve the brands, he may grant the approval thereof. Such approval may be in force even after the expiry of the certificate of registration, if there is no change in the design and layout of the brand/label so approved :

Provided that, if there is change in the design and layout of the brand/label so approved, the holder of certificate of registration shall apply for fresh approval of brand/label.”.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.